Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक १]        गुरुवार ते बुधवार, जानेवारी ६-१२, २०२२/पौष १६-२२, शके १९४३        [पृष्ठे १, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून**

**वाचा :** कृषी उत्पन्न बाजार समिती, अमरावती यांचेकडील प्रस्ताव दिनांक ०३-११-२०२१.

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३(१) अंतर्गत प्राथमिक अधिसूचना**

क्रमांक जिऊनिअम-पणन-१-अधिसूचना-प्राथमिक-४८७४-२०२१.—

ज्याअर्थी, अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्रात यापूर्वी वेळोवेळी नियमन करण्यात आलेले आहे.  कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती यांनी संचालक मंडळ सभा दिनांक २०-०९-२०२१ रोजी ठराव क्र. ८(२) अन्वये अमरावती बाजार समितीचे धान्य बाजार आवारातील टि.एम.सी. यार्डवर पाच हजार चौ.फुट जागेवर रेशीम शेतमालाचे नियमन करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३ (१) अंतर्गत महाराष्ट्र शासन कृषि व सहकार विभाग यांचे आदेश क्र. ॲपीएम-२०८१-३६३४०-४०-११-स, दिनांक ५ सप्टेंबर १९८१ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, मी, राजेश लव्हेकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समिती अमरावतीचे बाजार आवारावर यापूर्वी धान्याचे नियमन करण्यात आलेले आहे व आता रेशीम  शेतमालाचे नियमन करण्याचा आपला इरादा जाहीर करीत आहे.

ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती (सहकार संकूल कांता नगर) यांचे कार्यालयात प्राप्त झालेल्या हरकती वा सूचना विचारात घेण्यात येतील.

**राजेश लव्हेकर,**
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
अमरावती.

अमरावती :
दिनांक ०३ डिसेंबर २०२१.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.